तरुण भारत
रविवार दि. ९ सप्टेंबर २०१८



**Exhibition of Ayurvedic Juices**
**08/09/2018**

# आयुर्वेदिक सरबत आरोग्यदायी

## प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर : विवेकानंद महाविद्यालयात सरबत प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

पश्चिम महाराष्ट्र जैवविविधता मुबलक प्रमाणात आहे. त्यामुळे येथील पालेमाज्या, फळांच्या माध्यमातून तयार केलेले आयुर्वेदिक सरबत आरोग्यदायी आहे, असे मत प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी व्यक्त केले.

विवेकानंद महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित आयुर्वेदिक सरबत प्रदर्शनात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या प्रदर्शनात २५ प्रकारची सरबत उपलब्ध होते.



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात आयोजित आयुर्वेदिक सरबत प्रदर्शनात माहिती घेताना प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर. सोबत डॉ. एस. ए. पाटील, एस. बी. कुबल, एस. पी. साळोखे आदी.

प्राचार्य डॉ. होनगेकर म्हणाले, अशा प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आयुर्वेदिक वनस्पतींची ओळख झाली पाहिजे. तसेच पालेमाज्या व फळमाज्यांचे औषधी गुणधर्म समजले पाहिजेत. बाजारात मिळणारे तयार सरबत शरिराला अपायकारक असतात. त्यामुळे फळ, पालेमाज्यांपासून घरात तयार केलेल्या सरबतांचे सेवन केले पाहिजे. त्यामुळे आरोग्यात सुधारणा होऊन, प्रकृती चांगली राहते. आयुर्वेदिक सरबत प्रदर्शनात लेमन ग्लास, पातर, कवठ, आवळा, पेरू, सफरचंद, पिंक रोज, पपई, बेलफळ, टोमॅटो ॲपल कॉकटेल, कारल, दुधी भोपळा, बिट, हाळीव, खाऊच्या पाणाचा रस, पालक, आमसूल, कोकम, कोकनट आदी प्रकारचे सरबत उपलब्ध होते. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. ए. पाटील प्रास्ताविक केले. मयूरी गायकवाड यांनी आभार मानले. यावेळी प्रा. एस. बी. कुबल, प्रा. एस. पी. साळोखे, प्रा. ए. आर. कासारकर, प्रा. एम. पी. साळुंखे, प्रा. स्नेहल वांडकर, प्रा. ज्योति बोरूले, प्रा. अन्नपुर्णा आळवेकर, प्रा. उत्तरा गोडसे आदी उपस्थित होते. ८

सकाळ
कोल्हापूर, सोमवार,
१० सप्टेंबर २०१८



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थिनींनी आरोग्यदायी फळांची सरबते बनवली होती. या प्रदर्शनाची पाहणी करताना प्रा. मधुकर बाचुळकर.

VIVEKANAND COLLEGE
ESTD. JUNE 1964
KOLHAPUR-416 003

## विवेकानंद महाविद्यालयात सरबत प्रदर्शन

कोल्हापूर : बेलफळाचे सरबत. जास्वंदीचा चहा आणि पात्रीच्या फळांचा रस अशा विविध प्रकारचे रस विवेकानंद महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनींनी बनवले. या सरबतांचे प्रदर्शन शनिवारी (ता. ८) भरवले होते. सकाळी प्राचार्य एस. वाय. होनगेकर यांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले. प्रदर्शनात सुमारे २५ प्रकारचे सरबत ठेवले होते. आयुर्वेदात सांगितलेले व आपल्या आसपास सहज उपलब्ध असलेल्या फळांपासून ही सरबते बनवण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींनी फळांचे आरोग्याच्या दृष्टीने असणारे महत्त्व सांगितले. वनस्पती तज्ज्ञ प्रा. मधुकर बाचुळकर यांनी या प्रदर्शनाची पाहणी केली. प्रदर्शनाचे आयोजन एस. ए. पाटील, प्रा. एस. बी. कुबल, प्रा. एस. पी. साळुंखे, डॉ. अभिजित कासारकर

शुक्रवार
२०१८

पुढारी ७/९/१८

# ‘विवेकानंद’मध्ये उद्या आयुर्वेदिक सरबत प्रदर्शन

कोल्हापूर : आयुर्वेदिक वनस्पतींची ओळख व त्यांचे औषधी गुणधर्म यांची माहिती मिळावी, त्यांचा दैनंदिन जीवनात उपयोग व्हावा, या उद्देशाने विवेकानंद महाविद्यालयाचा वनस्पतीशास्त्र विभाग आणि विज्ञान मंडळाच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. ८) सकाळी ११ वाजता आयुर्वेदिक सरबत प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळ

## ‘विवेकानंद’मध्ये उद्या सरबत प्रदर्शन

सकाळ ७/९/१८

कोल्हापूर : वनस्पतिशास्त्र विभाग व विज्ञान मंडळाच्या संयुक्त विद्यमाने विवेकानंद महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागात आयुर्वेदिक सरबत प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. हे प्रदर्शन शनिवारी (ता. ८) सकाळी ११ वाजता होईल. याचा लाभ घेण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर व विभागप्रमुख प्रा. एस. ए. पाटील यांनी केले आहे.

तरुण भारत.

तरुण भारत

## ‘विवेकानंद’मध्ये उद्या ‘आयुर्वेदिक सरबत प्रदर्शन’

कोल्हापूर : आयुर्वेदिक वनस्पतींची ओळख व त्यांचे औषधी गुणधर्म यांची माहिती मिळावी व त्यांचा दैनंदिन जीवनामध्ये कसा उपयोग करून घेता येईल. यासाठी वनस्पतीशास्त्र विभाग व विज्ञान मंडळाच्या संयुक्त सहयोगाने विवेकानंद कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागात आयुर्वेदिक सरबत प्रदर्शन शनिवारी ८ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केले आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर व वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. एस. ए. पाटील यांनी केले आहे.

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416 003

7·9·18
Head
Department of Botany
Vivekanand College
Kolhapur